अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ७ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २३-१२-२०११.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ७ , दिनांक २८-१२-२०११.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.................................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक २८-१२-२०११ रोजी दुपारी ३-०० वाजता माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात "** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सभा क्रमांक - ७ बुधवार दिनांक २८-१२-२०११ रोजी दु. ३.०० वां होणा-या मा.खास सभेची

**विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| २५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत प्राप्त झालेल्या सविस्तर प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २३-१२-२०११.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २५** **दिनांक : २८ / १२ /२०११.**

---

**प्रस्तावाचा विषय :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत प्राप्त झालेल्या सविस्तर प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** अतिक्रमण निर्मुलन विभाग जा.क्र.५१० दिनांक २६/०७/२०११.

सार्व.बांधकाम विभाग दिनांक ०८/०७/२०११ चे पत्रानुसार अतिक्रमण विभागाने अतिक्रमित भाग काढुन घेण्याची कार्यवाहीसाठी संदर्भीय पत्रान्वये इकडेस पाठविलेले आहे. सदर कामाचे सुशोभिकरण, सुधारणा व देखभाल दुरुस्ती बांधकाम विभाग करत असलेने अतिक्रमण काढणेची पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाने पाठविले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व डॉ.आंबेडकर पुतळा हे बांधकाम विभाग किंवा महानगरपालिकेने सदर पुतळे उभारलेले नसुन सुमारे २० वर्षापुर्वी तत्कालीन नगरपालिका काळात सदर पुतळे उभारलेले आहेत. रुढीप्रमाणे व आदेशाप्रमाणे महानगरपालिकेस या थोर पुरुषांचे पुण्यतिथी व जन्मतिथीचे सोहळे करणे क्रमप्राप्त असलेने या सोहळयांसाठी नियोजन करणे व वार्षिक देखभाल दुरुस्ती हे कामे बांधकाम विभागामार्फत केली जातात.

संदर्भीय पत्र मिळाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिका-यां समवेत सदर रस्त्याची पाहणी केली असता खालील प्रमाणे अतिक्रमणे काढावी लागणार आहे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पत्रा व्यतिरिक्त देखिल काही अतिक्रमणे काढावी लागणार आहे ते खालील प्रमाणे.

| अ.क्र. | नांव | अतिक्रमण | अतिक्रमणानंतर करावी लागणारी कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | स्वस्तिक चौकातील ही-मॅन पुतळा | संपुर्ण पुतळा काढावे लागणार आहे. | सदर ठिकाणी ही-मॅन पुतळा काढणे किंवा कसे याबाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेवुन अतिक्रमण काढणे योग्य |
| २ | इंम्पिरीअल चौक शिवाजी पुतळा | कडेच्या भिंतीपासुन २.५ मीटर आतमधील म्हणजे शिवाजी पुतळा व्यतिरिक्त कंम्पौंड वॉल, मावळयाची प्रतिकृती इ.काढावी लागते. | सदर ठिकाणी २.५ मीटर आत संरक्षक भिंत मार्बल फिनीशमध्ये बांधणे, मावळयाची प्रतिकृती २.५ मी. आत लावणे किंवा उभारणे किंवा काढुन टाकणे. |
| ३ | महावीर कलादालन | संरक्षक भिंत व कारंजा इत्यादी हलविणे | नविन संरक्षक भिंत बांधणे व कारंजा काढणे किंवा नविन उभारणे, पेव्हींग ब्लॉक टाकणे. |
| ४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा | संपुर्ण डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा व पुतळयाभोवतीचे सुशोभिकरण काढावे लागणार आहे. | सदर ठिकाणी कोणतेही नविन काम करता येणार नसुन पुतळा नविन ठिकाणी स्थलांतरीत करणे किंवा कसे सदर बाब भावनात्मक व धोरणात्मक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मार्केटयार्ड चौक | अशोकचक्र व देवीचे मंदिर काढावे लागणार असुन महानगरपालिकेस फक्त अशोकचक्र काढावे लागणार आहे. | देवी मंदिर महानगरपालिकेचे नाही. अशोकचक्र काढणे संदर्भात नगररचना विभागाचा अभिप्राय घेवुन टाकणे योग्य. |

त्याकारणे उपरोक्त ठिकाणी काढावयाचे अतिक्रमण काढणेसाठीच्या एकुण ५ कामासाठीचा नगररचना विभागाचा अभिप्राय घेणेस्तव तसेच शिवाजी पुतळयास व महावीर कलादालनास नविन संरक्षक भिंत बांधणेस व डॉ.आंबेडकर पुतळा स्थलांतर करणेसाठी जागा नगररचना विभागामार्फत निश्चीत करुन त्यासाठीची पुढील कार्यवाही केल्यानंतर पुतळा स्थलांतरीत करणेस्तव व कराव्या लागणा-या नविन बांधकामासाठी लाईन-आउट व सिमा निश्चीती सार्वजनिक विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे विचारणा करणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपशहरअभियंता यांचा अभिप्राय की, क.अभियंता यांच्या रिपोर्टनुसार ५ कामांसाठीचा नगररचना विभाग अभिप्राय घेणेस्तव तसेच शिवाजी महाराज पुतळयास व महावीर कलादालनास नविन संरक्षक भिंत बांधणेस व डॉ.आंबेडकर पुतळा स्थलांतर करणेसाठी जागा निश्चीत करणेस मा.नगररचना विभागास आदेश होणेस.

तसेच सिमा निश्चीती बाबत सा.बा.विभागास पत्र देणे उचित वाटते मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार यांच्या अभिप्रायासह सादर करणे.

नगररचना विभाग जा.क्र.१९१९
दिनांक ०८/०९/२०११.

सादर,

विषय : अहमदनगर शहरातील उड्डाणपुलाच्या बांधकामामध्ये रस्त्याचे कामात येत असलेल्या बांधकामाबाबत...

१) स्वस्तिक चौकातील ही मॅन पुतळा काढणेस हरकत नाही.

२) बस स्टॅण्ड जवळील मा.शिवाजी महाराज यांच्या पुतळयास कोणतीही हानी पोहचत नाही. भोवतीचे कंम्पौंड वॉल व मावळयांची प्रतिकृती इत्यादी हलवुन २.५ मीटर आत स्थलांतरीत करणेस हरकत नाही.

३) महावीर कलादालनाची संरक्षक भिंत, कारंजा, पुतळे इत्यादी काढुन आतील बाजुस स्थलांतरीत करणेस हरकत नाही.

४) मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इतरत्र महानगरपालिकेच्या जागेत पुर्नस्थापीत करणेस हरकत नाही.

५) देवीचे मंदिर महानगरपालिकेचे नाही. त्यामुळे त्याबाबत अभिप्राय देता येणार नाही. मात्र अशोकचक्र इतरत्र स्थलांतरीत करणेस हरकत नाही.

उपरोक्त संरक्षक भिंत पुतळे, कारंजा इत्यादी पुर्नस्थापीत करणे बाबतची कामे मा.शासनाच्या बांधकाम विभाग किंवा उड्डाणपुलाच्या ठेकेदारामार्फत करुन घेणे योग्य होईल.

तसेच पुतळे स्थलांतरीत / पुर्न:स्थापीत करणेचे काम भावनात्मक व धोरणात्मक असल्याने सदर कामे करणेपुर्वी याबाबी मा.महासभेच्या निदर्शनास आणणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्र.शहर अभियंता ठिकाणनिहाय अहवाल/ अभिप्राय देणे.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित उड्डाणपुलाच्या रस्त्यात येणारे पुतळे इ. महानगरपालिकेच्या सिध्दीबाग, देशपांडे उद्यान मच्छीबाग किंवा इतरत्र महानगरपालिकेच्या जागेत पुर्न:स्थापीत करणेस हरकत नाही.

यावर कनिष्ठ अभियंता फेर रिपोर्ट सादर की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार, स्वस्तिक चौकातील पुतळा व अशोकचक्र, मार्केटयार्ड चौक अतिक्रमण विभागामार्फत काढुन घेणेस व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा इतरत्र हलविणेस व शिवाजी महाराजांच्या पुतळयाची संरक्षक भिंत व महावीर कलादालनाची भिंत पाडुन नविन भिंतीची पुर्न:बांधकाम संबंधित ठेकेदाराकडुन करुन घेणे मा.कार्यकारी अभियंता, सा.बा.वि. यांना कळविणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.कार्यकारी अभियंता सा.बा.वि. यांना सदर कामे आपल्या स्थरावर करुन घेणेस पत्र देणे उचित वाटते मान्यतेस्तव सादर.

यावर शहरअभियंता याचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग यांना पत्र देणे योग्य.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्र.शहर अभियंता चर्चा करा.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा केली छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाची संरक्षण भिंत महावीर कलादालन भिंती संदर्भात प्रस्तावानुसार मा.कार्यकारी अभियंता, सा.बा.वि. यांना कळविणेस हरकत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा जागा निश्चीत करुन हलविणे तसेच स्वस्तिक चौकातील पुतळा व अशोकचक्र, मार्केट यार्ड हे शहर अभियंता, बांधकाम विभाग यांच्या नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणा खाली काढणे योग्य त्यानुसार आदेशास्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, न.र.याने "अ" अहवालानुसार हरकत नाही महासभेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने मा.महासभेपुढे ठेवा.

चर्चा :-

मा.सौ.नंदा साठे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची सद्यस्थितीतील जागा रस्ता रुंदीकरणाने किती बाधीत होत आहे. त्याठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीची किती जागा आहे. पुतळया जवळील अतिक्रमण काढणे करीता यापुर्वी अनेकवेळा आंदोलने झालेली आहेत. तरी त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. हा पुतळा अनेक दिवसापासुन त्याठिकाणी आहे. त्यामुळे सदर जागेतुन पुतळा इतरत्र न हलविता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा तेथे बसवावा.

मा.सौ.मालन ढोणे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासाठी जागा निश्चित करण्याकरीता मा.शासनाने प्रस्ताव तयार करुन पाठविला आहे. त्यावर सभेने निर्णय घ्यावयाचा आहे. सर्व आंबेडकरी संघटना अधिकारी पदाधिकारी यांची समिती नेमुन त्यांचे म्हणणे ऐकुन त्यावर सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री.विजय गव्हाळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे त्याच ठिकाणी ठेवण्यांत यावा. सदर पुतळयासाठी अनेक वेळा बजेट मध्ये तरतुद होवुनही कारवाई केली जात नाही. पुतळया शेजारील हॉटेल सुखसागरचे अतिक्रमण त्वरीत काढण्यांत यावे. ती महानगरपालिकेची जागा आहे.

मा.श्री.सुनिल कांबळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळील अतिक्रमण काढणे बाबत वेळोवेळी सुचना केलेल्या आहेत. अद्यापपर्यंत महानगरपालिके मार्फत तेथील अतिक्रमण निघालेले नाही. हॉटेल सुखसागरला दिलेला अन्न परवाना त्वरीत रद्द करावा.

श्री.निकम नगररचनाकार :- हॉटेल सुखसागर ही महानगरपालिकेची जागा आहे. मुख्य रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर अंतरावर आपणांस पुतळा बसविता येणार नाही. ५ ते ६ मीटर रुंद जागा रस्त्याच्या रुंदीकरणा मुळे बाधीत होत आहे. १० ते १२ मीटर जागा शिल्लक रहात आहे.

मा.आयुक्त :- हॉटेल सुखसागर व कै.बार्शिकर यांना राहणेसाठी महानगरपालिकेने दिलेली जागा अशा दोन्हीही जागा अतिक्रमण काढुन खाली केल्या तरी आपण त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवु शकत नाहीत. रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर जागा सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासाठी पर्यायी जागा निवडणे आवश्यक आहे. सदरील जागेतील अतिक्रमण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हे दोन्हीही विषय वेगवेगळे आहेत.

मा.श्री.विनित पाअुलबुधे :- हॉटेल सुखसागरची जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. तेथील अतिक्रमण महानगरपालिकेने त्वरीत काढावे.

मा.आयुक्त :- हॉटेल सुखसागरच्या जागेवरील अतिक्रमण काढणेसाठी मिळकत वापरणारांनी कोर्टाकडुन स्टे मिळविलेला आहे. स्टे उठताच अतिक्रमण काढणे बाबत कार्यवाही करण्यांत येईल. परंतु तत्पुर्वी उड्डाणपुलाचे काम चालू होणार असल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उड्डाणपुलाच्या कामात येणार असल्याने त्यांचा पुतळा आपणांस इतर ठिकाणी जागा निवडुन तेथे स्थानापन्न करणे आवश्यक आहे.

मा.श्री.अंबादास पंधाडे :- हॉटेल सुखसागर व बार्शिकर यांना दिलेली जागा येथील अतिक्रमण काढणे करीता महानगरपालिकेस काय अडचण आहे. गेली सात ते आठ वर्षापासुन तेथील अतिक्रमण काढणे बाबतचा विषय येत आहे. अद्यापपर्यंत अतिक्रमण काढले जात नाही. सदर जागेवरचा स्टे कधी उठणार.

मा.श्री.किशोर डागवाले :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा स्थापनेसाठी जागा बदलणे आवश्यक आहे. जागा निवडीकरीता सर्व संघटनांना एकत्र घेवून त्यांचा निर्णय घ्यावा. त्यानुसार कार्यवाही करावी. सध्याच्या पुतळया समोरील जागा चांगली आहे. तेथेही पुतळा बसवु शकता. पांजरपोळची जागा पुतळा बसविणे कामी आरक्षीत करणेत यावी.

मा.श्री.सुनिल कांबळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करतेवेळी सर्व पक्षीय संघटनांना एकत्र घेवुन त्यांचे मत जाणुन घेवुन त्याप्रमाणे पुतळा तयार करण्यांत यावा.

मा.श्री.विजय गव्हाळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे त्याच जागेत ठेवणेत यावा. पुतळा इतरत्र हलवू नये.

मा.आयुक्त :- मुख्य रस्ता रुंदीकरणाची ३७ मीटर जागेची अडचण आहे. हॉटेल सुखसागर व बार्शिकर यांना दिलेली जागा या दोन्ही जागा धरुनही पुतळा उड्डाणपुला खाली येईल. सद्यस्थितीतील पुतळा हलविणेसाठी वेळ लागणार आहे.

मा.महापौर :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळ उड्डाणपुलाचे काम सुरु झाल्यानंतर जागा कधी निवडणार चालू कामात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कोठे ठेवणार याबाबत अनेक अडचणी आहेत. तरी महासभेने जागा निवडी बाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मागील काळात शहीद भगतसिंग यांचा पुतळा बसविणे बाबतही अशाच प्रकारे अडीअडचणी आलेल्या आहेत.

मा.श्री.सुनिल कांबळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हलवुन इतर ठिकाणी स्थानापन्न करणेकामी मा.शासनाच्या नियमांची पुर्तता केली गेली आहे काय ?

मा.आयुक्त :- मा.शासनाच्या परवानगी साठीच महानगरपालिकेच्या ठरावाची आवश्यकता आहे.

मा.श्री.विजय गव्हाळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळील काम सुरु झाल्यानंतर सद्यस्थितीतील पुतळा हलविणे बाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- मा.शासनाच्या सर्व प्रकारच्या परवानग्या व पुतळया साठी चौथरा बांधकाम पुर्ण झाल्याशिवाय सद्यस्थितीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे त्या जागेवरुन हलवू नये.

मा.श्री.अनिल शेकटकर :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा विषय हा तहकुब करावा. सर्व मागासवर्गीय संघटनांना एकत्रीत करुन त्यांना विश्वासात घेवुन निर्णय घ्यावा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हलविणे कामी कमिटी नेमुन विषय मंजूर करावा.

---*---

**ठराव :-**

सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील पत्र व्यवहारानुसार सादर झालेला कार्यालयीन प्रस्ताव व महासभेमध्ये झालेली सविस्तर चर्चा पाहता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा मार्केट यार्ड चौकामध्ये पुतळा असलेल्या जागेची मा.महापौर, मा.आयुक्त तसेच सर्व पदाधिकारी, मनपा व सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी यांनी पाहणी करावी. सदर पाहणी करीता आंबेडकर चळवळीच्या विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मा.जिल्हाधिकारी, मा.जिल्हा पोलिस प्रमुख यांना निमंत्रीत करुन त्यांचेसह पाहणी करण्यात यावी. सदर पुतळा स्थलांतरीत करणे आवश्यक असल्यास पुतळा हलविणे पुर्वी ज्या जागेत पुतळा स्थलांतरीत करावयाचा आहे. त्या बाबत संपुर्ण कायदेशिर प्रक्रीया जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन यांचेशी संपर्क साधुन पुर्ण करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व परिसर सुशोभिकरण करणे याप्रस्तावास देखील ही सभा मान्यता देत आहे. या पुतळयाची जागा निश्चित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच या कामासाठी अर्थ संकल्पात तरतूद करणेसाठी कार्यालयीन सोपस्कार करण्यासाठी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन निर्णय घेण्यासाठी सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यांत यावा.

सुचक : मा.श्रीमती.ढोणे मालन सुरेश

अनुमोदक : मा.श्री.डागवाले किशोर आसाराम

सही/-

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.